

सातारा : सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शनप्रसंगी उपस्थित विद्यार्थी.

# गुरुकुल स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती

**सातारा :** यशोदा टेक्निकल कॅम्पस व क्विक हिल फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत शाहूनगर येथील गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच सामूहिक शपथ देत सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यात आली. लहान मुलांमध्ये ऑनलाईन गेम खेळण्याचे प्रमाण वाढले आहे. या गेममधून डमी युजर्स क्रिएट करणे, त्या माध्यमातून माहिती गोळा करणे, व्हॉटस्‌ॲपवर नंबर शेअर करणे, आई-वडील, कौटुंबिक माहिती व आर्थिक उत्पन्न काय आदी माहिती मिळवली जाते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढत आहे. लहान मुलांना जाळ्यात ओढून गैरवापर केला जातो. या पार्श्वभूमीवर मोबाईल हाताळताना कोणती काळजी घ्यावी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे, ऐश्वर्या चोरगे, अर्जुन चोरगे, मुख्याध्यापिका शीला वेल्हाळ, अनुराधा कदम, सोनाली तांबोळी, विश्वनाथ फरांदे व शिक्षक उपस्थित होते.